# नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)

## सभा क्र. १२

- वार :- मंगळवार
- दिनांक :- १८.०२.२०२५
- वेळ :- सकाळी १०.०० वाजता
- स्थळ :- साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

# विषयावरील ठराव

# (इतिवृतांत)

**कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**
सदर बझार, आर.टी.ओ. ऑफिस जवळ, सातारा
फोन नं. ०२१६२-२३०६३६, २३३००५
ईमेल - office@kbpcoes.edu.in
वेबसाईट - www.kbpcoes.edu.in

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १२/२०२५/** **दि. - १८.०२.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १२**
**दिनांक - १८.०२.२०२५**
**वेळ - सकाळी १०.०० वाजता**
**स्थळ - साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १२ वी सभा **मंगळवार दि. १८.०२.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

**विषय – पत्रिका**

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र ११. दि. १९.०८.२०२४ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | |
| विषय क्र. २ | महाविद्यालयातील उल्लेखनीय बाबींची माहिती देणे. | |
| विषय क्र. ३ | महाविद्यालयातील सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ४ | महाविद्यालयास Autonomy घेण्याबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ५ | सत्य शोधक (Fact Finding) च्या अहवाला बाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ६ | महाविद्यालयात नवीन खरेदी समिती गठन करणेबाबत. | |
| विषय क्र. ७ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या Annual Quality Assurance Report (AQAR) ला मान्यता घेणे. | |
| विषय क्र. ८ | महाविद्यालयामध्ये नवीन Robotics Lab स्थापन करणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ९ | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ADHOC शिक्षकांची संस्थेमार्फत नेमणूक करणेस परवानगी मिळणेबाबत व त्यांच्या पगाराविषयी धोरण ठरविण्याबाबत. | |
| विषय क्र. १० | शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी सादर केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ११ | सेवानिवृत्त झालेल्या सेवकांनी विविध आर्थिक मागणीसाठी केलेल्या अर्जाबाबत योग्य निर्णय घेणेबाबत. | |
| विषय क्र. १२ | वाय. सी कॉलेज सातारा या महाविद्यालयातील विद्यार्थी या महाविद्यालयाचे वसतीगृह सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षात वापरत असलेल्या वसतीगृहाबाबत. | |
| विषय क्र. १३ | डॉ. आलदर दिलीप एस. यांच्या महाविद्यालयातील वर्तणूकीबाबत. | |
| **विषय क्र. १४** | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबी विषयी मंजुरी घेणे.** | |
| विषय क्र. १४.१ | महाविद्यालयातील कार्यरत असलेले १७ शिक्षकेत्तर सेवकांना २४ वर्षाची कालबद्ध पदोन्नतीचा माहे जानेवारी २०२४ पासून फरक देण्याबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १४.२ | Artificial Intelligence & Data Science या नवीन विद्याशाखेस आवश्यक | |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

| | | |
|---|---|---|
| | असणाऱ्या साहित्यांची खरेदी करणेस परवानगी घेणेबाबत.<br>१.बेंचेस २. संगणक ३. फर्निचर | |
| विषय क्र. १४.३ | महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | |
| विषय क्र. १४.४ | महाविद्यालयातील सुरक्षा रक्षक यांची ऑनलाईन द्वारे निवेदाद्वारे निवड करणेत आली होती सदर नेमणूक कालावधी माहे सप्टेंबर २०२४ रोजी पूर्ण झाला असून त्यापुढील मानधन दरमहा ठरविलेल्या दरानुसार अदा करणेस परवानगी मिळावी. | |
| **विषय क्र. १५** | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

प्रत - सर्व सन्माननीय सदस्य - नियामक मंडळ

**जा. क्र. ग.ब.स./सभा १२/२०२५/** **दि. - १८.०२.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १२**
**दिनांक - १८.०२.२०२५**
**वेळ - सकाळी १०.०० वाजता**
**स्थळ - साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १२ वी सभा **मंगळवार दि.१८.०२.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य –**

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. दिलीप वळसे - पाटील साहेब | चेअरमन |
| २. | मा. चंद्रकांत दळवी साहेब IAS (Retd.)<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. विकास देशमुख साहेब IAS (Retd.)<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. प्रतापराव पवार | सदस्य |
| ५. | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य |
| ६. | मा. उदय जाधव | सदस्य |
| ७. | डॉ. सौ. एस. जे. मोदी | सदस्य |
| ८. | डॉ. सौ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ९. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मा.ना. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृत्तांत*

### विषयावरील ठराव

**विषय क्र. १. :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र ११. दि. १९.०८.२०२४ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे.**

**ठराव क्र. १**:- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ११, दि. १९.०८.२०२४ रोजीच्या इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे. तसेच मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ११, दि. १९.०८.२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१. | मागील नियामक मंडळ (गर्व्हर्निंग बॉडी) सभा क्र १० दि. ३०.१२.२०२३ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून सर्व सहमतीने कायम करणेत आला. |
| ठराव क्र.०२. | महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाबाबत माहिती देणे. | १.महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम<br>२.महाविद्यालयातील विद्यार्थांकरिता व्याख्यान<br>३.महाविद्यालयाच्या BSH या विभागामार्फत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते<br>४.सांस्कृतिक उपक्रम<br>५.वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२४<br>वरील उपक्रमाबाबत सभेस माहिती दिली व सभेने अवलोकन केले तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. |
| ठराव क्र.०३. | कै. भूपाल अण्णा बहिशेट व श्रीमती लीलावती व देवेंद्र बसप्पा दोड्‌ण्णावर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारे पारितोषिक बाबत व इमर्सन शिष्यवृत्ती, कमिन्स शिष्यवृत्ती बाबत. | सभेने चर्चा करून सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. |
| ठराव क्र.०४. | महाविद्यालयाकरिता स्वतंत्र सेवा नियम (**Service Rules**) तयार करणेबाबत चर्चा करणे. | स्वतंत्र सेवा नियम तयार करणेसाठी दोन तज्ञ, ॲडव्होकेट व महाविद्यालयातील शिक्षक यांची समिती गठीत करावी व त्यानुसार सर्व नियमांचे अवलोकन करून महाविद्यालयातील स्वतंत्र सेवा नियम तयार करण्याबाबत सभेने सुचविले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. |
| ठराव क्र.०५. | महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून Autonomy घेण्याबाबत चर्चा करणे. | सभेने चर्चा करून महाविद्यालयास **Autonomy** करणेसाठी सर्व बाबींची माहिती घ्यावी व त्यासाठी लागणारी तयारी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये करावी व पुढील शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयास **Autonomy** घ्यावी असे सभेने सूचित केले. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र.०६. | Mechanical Engineering व Civil Engineering या विभागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कर्मवीर शिष्यवृत्ती देणेबाबत चर्चा करणे. | शै. वर्ष २०२४-२५ पासून प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना कर्मवीर शिष्यवृत्ती देण्याकरिता संबधित विभागाची कमिटी गठीत करावी व कमिटी मार्फत शिफारस घेऊन प्रवेशित विद्यार्थ्यांना कर्मवीर शिष्यवृत्ती देण्यात यावी. त्यानुसार कमिटी गठीत करून कमिटीच्या शिफारशी नुसार सिव्हील विभागातील व मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. |
| ठराव क्र.०७ | महाविद्यालयात C-DAC Authorised Training Center (ATC) सुरु करणेबाबत चर्चा करणे. | सभेने चर्चा करून विद्यार्थ्यांची Placement होण्यासाठी C-DAC Authorised Training Center (ATC) उपयुक्त असल्याने सदर सेंटर सुरु करण्यास परवानगी दिली. त्यानुसार पुढील प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. |
| ठराव क्र.०८ | महाविद्यालयात Innovation Incubation Center साठी स्वतंत्र पायाभूत सुविधा निर्माण करणे बाबत. | वाय. सी. कॉलेज मध्ये सुरु असणाऱ्या CIII सेंटरच्या सर्व सुविधा वापराव्यात व प्रत्येक विभागामध्ये एक तज्ञ व्यक्ती (इंडस्ट्री तज्ञ) ची नेमणूक करावी व त्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी घ्यावे असे ठरले. |
| ठराव क्र.०९ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या Annual Quality Assurance Report (AQAR) ला मान्यता देणे. | सभेने चर्चा करून सन २०२२-२३ च्या AQAR ला मान्यता दिली. त्यानुसार NAAC च्या संकेतस्थळावर AQAR भरला. |
| ठराव क्र.१० | महाविद्यालयामधील स्थानिक व्यवस्थापन समिती LMC बाबत माहिती देणे. | संस्थेमार्फत निवडणूक अधिकारी नेमून स्थानिक व्यवस्थापन समितीचे गठन करण्यास सुचविले. |
| ठराव क्र.११ | महाविद्यालयातील श्री. पडवळ संदेश बळीराम लेखापाल यांच्या मागील संस्थेतील वेतनश्रेणी संरक्षित करणेबाबत चर्चा करणे. | रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयास पत्रव्यवहार करावा व लेखापाल या पदाची वेतनश्रेणी तपासून संस्था आदेशानुसार कार्यवाही करावी असे सभेने सूचित केले त्यानुसार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. |
| ठराव क्र.१२ | Electronics Engineering या विभागातील शिक्षक सेवकांचे Electronics & Telecommunication Engineering व Production Engineering या विभागातील शिक्षक सेवकांचे Mechanical Engineering या विभागात समायोजन करणेबाबत चर्चा करणे. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे या विद्यापीठाची मान्यता घ्यावी असे सभेने सूचित केले. त्यानुसार विद्यापीठास पत्रव्यवहार करणेत आला असून त्याबाबतची विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरु आहे. |
| ठराव क्र.१३ | Software Development Cell मार्फत देण्यात येत असलेल्या ERP Software चे Rate बाबत चर्चा करणे. | याबाबत सभेने चर्चा करून १००/- प्रती विद्यार्थी या दराने ERP Software महाविद्यालयांना देण्यात यावे असे सूचित केले. |
| ठराव क्र.१४ | महाविद्यालयातील १४ सेवकांनी मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्याबाबतची माहिती देणे. | सभेने अवलोकन केले व संस्था स्तरावर ॲडव्होकेट यांची नेमणूक करून योग्य ती कार्यवाही करावी असे सूचित केले. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र.१५ | महाविद्यालयातील कार्यरत सेवकांनी केलेल्या विविध मागण्याबाबत चर्चा करणे | **मुद्दा क्र १ व ३** मधील बाबी या आर्थिक स्वरूपाच्या असून महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती व महाविद्यालयामध्ये करावयास लागणाऱ्या सुधारणा या सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करून निर्णय घेण्यात यावा असे सभेने सूचित केले.<br>मुद्दा क्र. २ नुसार सभेने चर्चा करून कायदेशीर सल्ला घेण्यात यावा असे सुचविले. |
| ठराव क्र.१६ | मुलांचे वस्तीगृह व मुलींचे वस्तीगृह दुरुस्ती करणे किंवा नवीन बांधण्याबाबत चर्चा करणे | मुलांच्या वस्तीगृहाची आवश्यकती दुरुस्ती करावी. तसेच मुलींच्या वस्तीगृहाचे नूतनीकरन करणेसाठी तज्ञ आर्किटेक्ट यांच्याकडून वसतीगृहाचा Plan तयार करून एकूण अंदाजे येणाऱ्या खर्चाचा तपशील तयार करावा, व याकरिता गरज भासल्यास कर्ज घेऊन निधी उपलब्ध करून मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम करावे असे सभेने सुचवले. त्यानुसार प्रा. शेलार ए. बी. यांना जबाबदारी दिली असून तज्ञ आर्किटेक्ट यांच्याकडून इमारतीचा Plan तयार करणे सुरु आहे. |
| ठराव क्र.१७ | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे** | -- |
| ठराव क्र.१७.१ | Artificial Intelligence & Data Science विभाग सुरु करणेस व CSE या विभागातील प्रवेश क्षमता वाढविण्यासाठी DBATU यांना भराव्या लागलेल्या फी बाबत तसेच DTE ला भरावी लागणाऱ्या फी ला परवानगी मिळणेबाबत. | सदर विद्यापीठास भराव्या लागलेल्या फी ला सभेने चर्चा करून कार्योत्तर परवानगी दिली.<br>तसेच नवीन विद्याशाखा सुरु केल्याने व विभागाची प्रवेश क्षमतेत वाढ केल्याने सर्वांचे अभिनंदन केले. |
| ठराव क्र.१७.२ | शुल्क नियामक प्राधिकरण (FRA) यांच्या अपिल फी खर्चास परवानगी मिळणेबाबत. | खर्चास परवानगी दिली व FRA या कार्यालयास भेट देऊन फी वाढीच्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा (Follow Up) घ्यावा असे सूचित केले. त्याबाबत FRA या कार्यालयास पाठपुरावा सुरु आहे. |
| ठराव क्र.१७.३ | AI & DS हि नवीन विद्याशाखा सुरु करणेस व **CSE** विद्याशाखेतील प्रवेश क्षमता वाढ करणेसाठी DTE, Mumbai यांना करणेत आलेल्या सयुंक्त मुदतठेव (FD) ला परवानगी घेणे. | सभेने चर्चा करून सदर सयुंक्त मुदतठेव (FD) ला कार्योत्तर परवानगी दिली. |
| ठराव क्र.१७.४ | हंगामी ADHOC शिक्षकांचे मानधन व रोजंदारी तत्वावर काम करत असलेल्या शिक्षकेत्तर सेवकांच्या मानधनाबाबत. | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये निवड केलेल्या adhoc शिक्षक सेवकांना व रोजंदारी तत्वावर काम करीत असलेल्या सेवकांना मानधन देण्यास परवानगी दिली. तसेच ADHOC शिक्षकांना दरमहा पगार व रोजंदारी सेवकांना मानधन देण्यात येत आहे. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र.१७.५ | Foreign Language learning Software व AICTE च्या Eduskill Internship Software खरेदी करणेबाबत चर्चा करणे. | आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये कामकाज करणेसाठी किंवा विद्यार्थ्यांना परदेशात नोकरी करणेसाठी सध्या जापनीज, जर्मन व फ्रान्स मध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करणेसाठी Foreign Language learning Software खरेदी करणेस सभेने चर्चा करून परवानगी दिली.<br>तसेच AICTE च्या Eduskill Internship Software मुळे विद्यार्थ्यांना Intership व Placement करिता फायदा होऊ शकतो याबाबत सभेने सदर Software खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली. त्यानुसार सदर Software खरेदी करणेत आले असून तीन वर्षाची Member Ship मिळालेली आहे. |
| ठराव क्र.१७.६ | Capgimini Centre मध्ये वातानुकूलित (AC) बसवण्यास व आतील दोन दरवाजे बसविण्यासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | सभेने परवानगी दिली त्यानुसार दोन दरवाजे बसविण्यात आले असून वातानुकूलित (AC) खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| ठराव क्र.१७.७ | Software Development Cell करिता E-Web Guru या कंपनीकडून Server Cloud Space घेण्यकरिता येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | सदर कंपनीकडून Server Cloud Space घेण्याकरिता येणाऱ्या खर्चास परवानगी दिली. |
| ठराव क्र.१७.८ | प्रा. श्रद्धा पाटील यांना Voucher द्वारे मानधन अदा करणेस परवानगी मिळणेबाबत | सभेने चर्चा करून कार्योत्तर परवानगी दिली व सदर सेवकाला मानधन अदा करणेत आले. |
| ठराव क्र.१७.९ | महाविद्यालयातील परीक्षा विभागात नवीन झेरोक्स मशीन खरेदी करणेस परवानगी मिळणेबाबत. | परीक्षा विभागात नवीन झेरोक्स मशीन खरेदी करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली त्यानुसार खरेदी प्रक्रिया सुरु आहे. |
| ठराव क्र. १७.१० | महाविद्यालयात Solar System 50 kv बसविणेस व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | Solar System बसविण्यासाठी सोलार पॅनल बाबत नामांकित व उत्कृष्ट कंपनी यांच्याशी संपर्क साधून संबधित कंपनीसोबत BOT तत्वावर सोलार पॅनल बसविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची माहिती घ्यावी त्यानुसार पुढील कार्यवाही करणेस व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी दिली. त्यानुसार डॉ. आलदर यांना जबाबदारी देण्यात आली आहे परंतु सदर सेवक कामकाज करण्याचे टाळाटाळ करीत असून अनावश्यक बाबी निर्माण करून पत्रव्यवहार करीत आहे. त्याबाबत सभेचे मार्गदर्शन मिळावे. |
| ठराव क्र. १७.११ | सेंटर वॉटर प्युरीफिकेशन बसवण्यास येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | सभेने चर्चा करून सेंटर वॉटर प्युरीफिकेशन बसविण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली. त्यानुसार महाविद्यालयातील दोन सेवकांना जबाबदारी देण्यात आली आहे. |
| ठराव क्र. १७.१२ | महाविद्यालयासाठी ५०० प्लास्टिक खुर्च्या घेण्यास येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | विविध विभागात खुर्च्या आवश्यकता असून त्याकरिता ५०० खुर्च्या खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी दिली. |

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र. १७.१३ | कर्मवीर भाऊराव पाटील उत्पादन केंद्र वर्ये येथून ५०० बेंच टप्प्या टप्प्याने घेण्यास येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील उत्पादन केंद्र वर्ये येथून ५०० बेंच टप्प्या टप्प्याने खरेदी करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली. |
| ठराव क्र. १७.१४ | सहा Interactive Panel व सहा Sliding Cover खरेदी करण्यास येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | सभेने चर्चा करून नवीन सहा Interactive Panel व सहा Sliding Cover खरेदी करण्यास व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र. १७.१५ | महाविद्यालयाच्या सिव्हील विभागात खरेदी करणेत आलेल्या Instrument हे थेट कंपनी मार्फत घेण्यात आले आहेत त्यास मंजुरी घेणे. | Aimil कंपनी हि एकच उत्पादक असल्याने व Tender ची प्रक्रिया करू शकत नसल्याने Aimil कंपनी मार्फत थेट Instrument खरेदी केलेल्या बिलांची रक्कम अदा करणेस परवानगी दिली. |
| ठराव क्र. १७.१६ | महाविद्यालयात झालेल्या International Conference चे Proceeding AICTE च्या UGC Core Listed Journal मध्ये Publish करणेसाठीची फी अदा करणेस परवानगी घेणे. | International Conference चे Proceeding AICTE च्या UGC Core Listed Journal मध्ये Publish करणेसाठी लागणाऱ्या फी ला परवानगी दिली. |
| ठराव क्र. १७.१७ | विद्यार्थ्यांच्या प्रवेश रद्द बाबत चर्चा करणे. | याबाबत सभेने चर्चा करून विद्यार्थ्यांच्या फी माफ करणेस परवानगी दिली. तसेच प्रवेश रद्द करणे संदर्भात अर्ज प्राप्त झालेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शहानिशा करून प्रवेश रद्द करावेत असे सभेने सुचविले. |
| **विषय क्र. १८** | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | -- |

**वरील नुसार मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ११ मधील सर्व ठराव मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले व सभेने चर्चा करून अवलोकन केले.**

**सूचक :- मा. उदय जाधव**
**अनुमोदक :- मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत

**विषय क्र - २. महाविद्यालयातील उल्लेखनीय बाबींची माहिती देणे**

**ठराव क्र. २ - महाविद्यालयात दि. ०१.०९.२०२४ पासून झालेल्या विविध उल्लेखनीय बाबींची माहिती खालीलप्रमाणे**

१. **महाविद्यालयास मिळालेल्या** UGC Act 2F **ची मान्यता मिळाल्याबाबत.**

महाविद्यालय सुरु झाल्यापासून UGC Act 2F & 12B ची मान्यता घेण्यात आलेली नव्हती. UGC Act 2F ची मान्यता मिळाल्यामुळे महाविद्यालय Autonomy घेता येते. 12B ची मान्यता मिळविण्यासाठी विद्यापीठाकडून महाविद्यालय कायम संलग्नत असल्याबाबतचे पत्र UGC ला देणेबाकी असल्याने सदरची 12B ची मान्यता अध्याप प्राप्त झाली नाही. सदरचा पाठपुरावा सुरु आहे. (सोबत UGC Act 2F मान्यता पत्र)

२. **डॉ. मोदी एस.जे. व डॉ. माने एस. व्ही. यांना** International Conference **आयोजित करणेसाठी AICTE AQIS Scheme अंतर्गत रु. ३,००,०००/- फंड मंजूर झाल्याबाबत.**

AICTE AQIS Scheme अंतर्गत महाविद्यालयातील डॉ. मोदी एस.जे. व डॉ. माने एस. व्ही. यांनी दिलेल्या प्रस्तावास मान्यता मिळून रु. ३,००,०००/- एवढा फंड मंजूर झाला असून International Conference आयोजित करणेत येईल.

३. **Sahyadri Software's Pune यांचे Center of Excellence (CoE) महाविद्यालयात सुरु करणेत आले आहे.**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमा सोबत विविध Software's ची माहिती होण्यासाठी Sahyadri Software's Pune यांनी Center of Excellence (CoE) चे सेंटर महाविद्यालयात स्थापन केलेले आहे. तसेच त्यांनी १० संगणक महाविद्यालयास दिलेले आहेत. यामधून विद्यार्थ्यांना Placement करिता संधी निर्माण होणार आहे.

४. **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या Placement बाबत.**

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या **Placement** करिता खालील तक्त्यानुसार विविध कंपन्यांनी महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन एकूण १८२ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे.

| Sr. No. | Name of the Company | Branch | Drive Date | Total No. of students placed |
|---|---|---|---|---|
| 1 | Epitome Components | E&TC | 14.12.2024 | 37 |
| 2 | Teachnook | All | 17.12.2024 | 36 |
| 3 | Qspiders | All | 07.11.2024 | 35 |
| 4 | i4C | E&TC | 15.10.2024 | 27 |
| 5 | QualityKiosk Technologies | CSE and E&TC | 28.11.2024 | 15 |
| 6 | Inled Technologies | Mechanical | 14.12.2024 | 12 |
| 7 | Acme Infovision | CSE and E&TC | 18.12.2024 | 8 |
| 8 | Sankey Solutions | CSE and E&TC | 13.12.2024 | 4 |
| 9 | Jaro Education | All | 04.11.2024 | 2 |
| 10 | Crane Flow Process Technologies | Mechanical | 19.11.2024 | 2 |
| 11 | IT Debbgers | CSE | 23.11.2024 | 2 |
| 12 | RSquareSoft Technologies | CSE and E&TC | 26.08.2024 | 1 |
| 13 | Joshi Jampala | Mechanical | 11.11.2024 | 1 |
| | **Total** | | | **182** |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

**५. महाविद्यालयातील विविध क्रिडास्पर्धेबाबत**

महाविद्यालयातील खालील विद्यार्थाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेच्या संघामध्ये निवड झालेली आहे.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | खेळाचे नाव | खेळाचा स्तर |
|---|---|---|---|
| १ | दर्शन प्रशांत जाधव | फुटबॉल | राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग |
| २ | निखील संजय शर्मा | हॉकी | |
| ३ | शिवधन रामचंद्र खंदारे | हॉकी | |
| ४ | हर्षदा शशिकांत निकम | कबड्डी | |
| ५ | चैताली अशोक पवार | कबड्डी | |
| ६ | कुणाल महादेव सपकाळ | बुद्धिबळ | |
| ७ | आर्या अभिजित घार्गे | बॅडमिंटन | क्रिडा महोत्सव स्पर्धा २०२४-२५ गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली सहभाग |
| ८ | गुंजन विजय भिलारे | बॅडमिंटन | |
| ९ | राधा राजकुमार साळुंखे | व्हॉलीबॉल | |
| १० | श्रीनाथ सुर्यकांत पिसाळ | भाला भेक | |
| ११ | रिद्धी रिंकू दळवी | ८०० मी धावणे | |
| १२ | ओमकार रवींद्र खरात | बास्केटबॉल | |
| १३ | सुरभी संतोष शिंदे | बास्केटबॉल | |
| १४ | पूर्वा महेश जंगम | टेबल टेनिस | |

**मुद्दा क्र.१ -** **महाविद्यालयास** UGC Act 2F **ची मान्यता महाविद्यालयास मिळाल्या बद्दल सभेने चर्चा करून अभिनंदन केले तसेच 12B ची मान्यता घेण्यास आवश्यक ती कार्यवाही करावी असे सभेने सुचविले.**

**मुद्दा क्र.२ - सभेने चर्चा करून डॉ. मोदी एस.जे. व डॉ. माने एस. व्ही यांचे अभिनंदन केले.**

**मुद्दा क्र.३ - सभेने अवलोकन करून** Sahyadri Software's Pune **यांचे** Center of Excellence (CoE) **महाविद्यालयात सुरु केल्याबद्दल अभिनंदन केले.**

**मुद्दा क्र.४- महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट बाबत सभेस माहिती घेऊन प्लेसमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर (टी.पी.ओ) , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचे अभिनंदन केले.**

**मुद्दा क्र. ५- सभेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या संघामध्ये निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, क्रीडा शिक्षक श्री. संकपाळ मयूर एस., डॉ. कणसे युवराज के. यांचे अभिनंदन केले.**

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ३ :- महाविद्यालयातील सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ३ :-** महाविद्यालयातील सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करणेसाठी वेळोवेळी परिपत्रके महाविद्यालयास येत असतात सध्याची महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने महाविद्यालयातील सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करणे बाबत चर्चा करणेत आली. त्यानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आर्थिक परिस्थितीचा आढावा सादर केला. आर्थिक परिस्थिती पाहता सभेने चर्चा करून माहे जानेवारी २०२५ पासून सातवा वेतन आयोग व निर्वाह भत्ता (DA) १६ % प्रमाणे मागील फरक न देण्याच्या अटीवर सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यास परवानगी दिली.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेशित विद्यार्थी संख्या व महाविद्यालयाची आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन सातवा वेतन आयोगातील निर्वाह भत्त्या (DA) बाबत पुढील निर्णय घेण्यात येईल असे ठरले.

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ४ :- महाविद्यालयास Autonomy घेण्याबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ४ :-** महाविद्यालय हे सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड विद्यापीठाशी संलग्नित असून या विद्यापीठाचा अभ्यासक्रम हा अद्यावत स्वरूपाचा नाही व आपण या अभ्यासक्रमामध्ये काही बदल करू शकत नाही, यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळणेसाठी अडचणी निर्माण होत आहेत. तसेच विद्यापीठाच्या परीक्षा घेण्याबाबत सुद्धा बऱ्याच अडचणी आहेत कोणतीही परीक्षा किंवा परीक्षेचे निकाल वेळेवर लागत नाहीत त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांच्या मध्ये नाराजी आहे आणि उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मार्कलिस्ट वेळेत मिळत नसल्याने त्यांना नोकरी मिळालेल्या कंपनीमध्ये कामावर रुजू होण्यास अडचणी निर्माण होत आहेत, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कॅम्पस मधून किंवा थेट नोकरी देताना कंपनी आपल्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी देताना विचार करीत आहेत. तसेच पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेताना मार्कलिस्ट च्या अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे कदाचित महाविद्यालयाच्या प्रवेशावर परिणाम होऊ शकतो. या सर्व बाबींचा विचार करता महाविद्यालयास Autonomy घेणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयास Autonomy घेण्याबाबतची माहिती सभेस दिली तसेच Autonomy बाबत योग्य ती कार्यवाही करावी, असे सभेने सुचविले.**

**सूचक :- डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक :- मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. ५ :- सत्य शोधक (Fact Finding) च्या अहवाला बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र ५ :-** श्री. देवी डी. बी. व इतर सेवकांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांकरिता रयत शिक्षण संस्थेच्या वतीने त्रिसदस्यीय समिती गठीत करणेत आली होती. या समितीने सेवकांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची महाविद्यालयामध्ये येऊन पडताळणी केली व त्याबाबतचा अहवाल मा. सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा यांना सादर केला. या अहवालाच्या आधारे मा. सचिव रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी महाविद्यालयास काही मुद्द्यांची पूर्तता करणे बाबतच्या सूचना पत्राद्वारे केल्या. या बाबतचा अहवाल समिती समोर ठेवण्यात येत आहे.

**सत्य शोधक (Fact Finding) चा अहवाला सभेस अवलोकनास ठेवण्यात आला त्यानुसार सदर अहवाला नुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती दिली.**

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ६. - महाविद्यालयात नवीन खरेदी समिती गठन करणेबाबत.**

**ठराव क्र. ६ -** रयत शिक्षण संस्थेच्या सत्य शोधक समितीच्या (Fact Finding) अहवालानुसार महाविद्यालयातील खरेदी समिती नवीन तयार करण्यास सुचविले आहे. त्यानुसार सभेने चर्चा करून महाविद्यालय खरेदी समितीचे गठन करणेस मार्गदर्शन करावे.

**महाविद्यालयात सध्या कार्यरत असलेली खरेदी समिती खालील प्रमाणे -**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. ए. सी. अत्तार (प्राचार्य) | चेअरमन |
| २ | श्री. धैर्यशील भोसले (इंडस्ट्री प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | डॉ. सौ. मोदी शबिना जे. (कार्यालय प्रतिनिधी) | सदस्य |
| ४ | डॉ. सौ. माने सुनिता व्ही. (BOG प्रतिनिधी) | सदस्य |
| ५ | प्रा. सौ. घाटगे दिपाली डी. (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| ६ | संबधित विभागप्रमुख | सदस्य / सचिव |

**संस्था नियमानुसार खालील प्रमाणे सदस्य असणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्राचार्य | चेअरमन |
| २ | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | कार्यालय प्रमुख | सदस्य |
| ५ | संबधित विभागप्रमुख | सदस्य / सचिव |

**महाविद्यालयाच्या खरेदी समिती मध्ये इंडस्ट्रीज प्रतिनिधी घ्यावा असे मा. प्रतापराव पवार यांनी सुचविले. याबाबत मा. सचिव साहेब, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या सोबत चर्चा करून व मार्गदर्शन घेऊन सदर समितीचे गठन करावे असे सुचविले.**

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. ७. - शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या Annual Quality Assurance Report (AQAR) ला मान्यता घेणे.**

**ठराव क्र. ७** - महाविद्यालयातील IQAC विभागाअंतर्गत Annual Quality Assurance Report (AQAR) तयार करणेत आलेला आहे. तसेच NAAC च्या संकेतस्थळावर त्यासंबधित सर्व माहिती अद्यावत करणेत आलेली आहे. तरी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या AQAR भरणेबाबत चर्चा करणे.

**याबाबत सभेने चर्चा करून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या Annual Quality Assurance Report (AQAR) ला कार्योत्तर मान्यता दिली.**

**सूचक :- डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक :- मा. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ८. - महाविद्यालयामध्ये नवीन Robotics Lab ची स्थापना करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ८** - महाविद्यालयामध्ये नवीन Robotics Lab ची माहिती घेण्यासाठी महाविद्यालयातील चार शिक्षक सेवक Autofina Robotics Centre of Excellence Lab at Government Polytechnic, Pune येथे भेट देण्यास गेले होते. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवाला नुसार महाविद्यालयामध्ये Robotics Lab तयार केल्यास महाविद्यालयातील व संस्थेच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. याबाबत सभेने चर्चा करून सदर Robotics Lab महाविद्यालयात स्थापन करणेस मार्गदर्शन करावे.

**सदर विषयाबाबत सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून महाविद्यालयामध्ये नवीन Robotics Lab ची स्थापना करणेसाठी सविस्तर अहवाल व प्रस्ताव तयार करून पुढील सभेमध्ये विषय ठेवण्यात यावा असे सभेने सुचविले.**

**सूचक :- मा. चंद्रकांत दळवी साहेब**
**अनुमोदक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ९ :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ADHOC शिक्षकांची संस्थेमार्फत नेमणूक करणेस परवानगी मिळणेबाबत व त्यांच्या पगाराविषयी धोरण ठरविण्याबाबत.**

**ठराव क्र. ९** – महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AI & DS ही नवीन विद्याशाखा सुरु झाल्याने पुढील शैक्षणिक वर्षाकरिता लागणाऱ्या शिक्षक सेवकांची नेमणूक लवकरात लवकर करणे आवश्यक असल्याने सदर नेमणूकीची प्रक्रिया सुरु करणेस सभेची परवानगी मिळावी. तसेच महाविद्यालयात इतर विभागात रिक्त असणारी शिक्षक सेवकांची पदे adhoc हंगामी तत्वावर आवश्यकेनुसार दरवर्षी नियामक मंडळाची व संस्थेची परवानगीने भरत आहोत.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संस्थेमार्फत विहित जाहिराती द्वारे नेमणूक करणेत येणाऱ्या ADHOC हंगामी तत्वावर नेमणूक करणेस सभेची परवानगी मिळावी. तसेच नेमणूक करण्यात येणाऱ्या ADHOC हंगामी शिक्षक सेवकांच्या पगाराबाबत योग्य धोरण सभेने ठरविण्यात यावे जेणेकरून नेमणूक केलेल्या शिक्षक सेवकांना दरमहा पगार अदा करणे सोयीची होईल.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता महाविद्यालयात नवीन सुरु झालेल्या AI & DS आणि इतर विभागात रिक्त असलेल्या शिक्षक सेवकांची संस्थेमार्फत ADHOC स्वरुपात शिक्षक सेवकांची नेमणूक करणेसाठी सभेस माहिती दिली. सभेने याबाबत चर्चा करून नेमणूक करणेत येणाऱ्या शिक्षक सेवकांचा एकत्रित सविस्तर अहवाल तयार करावा व पुढील सभेमध्ये विषय ठेवण्यात यावा असे सूचित केले.**

**सूचक :- मा. उदय जाधव**<br>
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**<br>
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.१०. - शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी सादर केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र १०** – महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सेवकांनी सादर केलेल्या अर्जाबाबत खालील प्रमाणे चर्चा करून सभेने मार्गदर्शन करावे.

**१.महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता नेमणूक केलेल्या हंगामी ADHOC शिक्षक सेवकांनी पगार वाढीसाठी केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे.**

**अ.श्री. पाटील संजीव व्ही. – टी. पी. ओ.** –श्री. पाटील संजीव यांचा माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये पगार वाढ करणेत आली होती. त्यांची जून २०२४ मध्ये कोणतीही पगार वाढ केली नव्हती त्यांनी १०% पगार वाढ होण्यासाठी विनंती अर्ज सादर केलेला आहे. सध्या सदर सेवकाला ७४७५०+१८००= ७६५५०/- दरमहा पगार अदा केला जातो.

**ब.डॉ. पाटील पोपट डी. सहाय्यक प्राध्यापक** -डॉ.पाटील पोपट डी. सहाय्यक प्राध्यापक यांची शैक्षणिक अर्हता M.A. SET, NET, M.Phil, PGCTE, PGDTE, Ph.D in English असल्याने व एकुण ११ वर्षाचा अनुभव असल्याने एकूण ६५०००/- दरमहा वेतन मिळावे असा अर्ज सादर केला आहे. सध्या सदर सेवकाला ४५३६०+१८००= ४७१६०/- दरमहा पगार अदा केला जातो.

**क.सौ. उमाप मनिषा हेमंत – ग्रंथपाल**- सौ. उमाप मनिषा हेमंत, ग्रंथपाल यांनी M.Lib, I.Sc. NET हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केली असून Ph.D पदवी चालू आहे. तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात एकुण १५ वर्ष कामकाज केले आहे. त्यामध्ये महाविद्यालयाचे NAAC, NBA व संस्था मार्फत होणाऱ्या AAA कमिटीचे कामकाज केलेलें आहे. त्यांनी सध्या असलेल्या पगारामध्ये ३०% पगार वाढ मिळणे बाबत अर्ज सादर केला आहे. सध्या सदर सेवकाला ३८८८०+१८००= ४०६८०/- दरमहा पगार अदा केला जातो.

**२.महाविद्यालयातील श्री. पडवळ संदेश बळीराम लेखापाल यांच्या मागील संस्थेतील वेतनश्रेणी संरक्षित करणेबाबत चर्चा करणे.**

महाविद्यालयातील श्री. पडवळ संदेश बळीराम, लेखापाल (Accountant) हे दि. ०३.०५.२०१८ पासून लेखापाल या पदावर कार्यरत आहेत. श्री. पडवळ या शाखेमध्ये रुजू होण्यापूर्वी मागील संस्थेमध्ये लेखापाल या पदाच्या वेतनश्रेणीनुसार (९३००-३४८००+४३०० AGP) वेतन मिळत होते. परंतु या महाविद्यालयामध्ये रुजू झाल्यापासून वरिष्ठ लिपिकाची वेतनश्रेणी (५२००-२०४००+२४००AGP) या वेतनश्रेणीनुसार जादा १६ वेतनवाढी देऊन मागील वेतन सरक्षित केले आहे. परंतु सध्या सदर सेवकाला बेसिक वेतन ११,८५० व AGP २४०० असून नवीन वेतनश्रेणीनुसार सद्याचे बेसिक वेतन हे ११४८० व ४३०० AGP होईल, त्याचा उपयोग सदर सेवकाला पुढील Pay Fixation च्या वेळेस होईल.

त्यानुसार लेखापाल या पदाच्या वेतनश्रेणीनुसार नेमणूक तारखेपासून वेतन श्रेणी ९३००-३४८००+४३०० AGP प्रमाणे निश्चित करून वेतन मिळावे याबाबत विनंती अर्ज महाविद्यालयात सादर केलेला आहे. तसेच मागील नियामक मंडळाची सभा क्र. ११ दि. १९.०८.२०२४ रोजी झालेल्या सभेतील चर्चे नुसार श्री. पडवळ संदेश बळीराम यांच्या लेखापाल या पदाच्या वेतनश्रेणीनुसार नेमणूक तारखेपासून वेतन श्रेणी ९३००-३४८००+४३०० AGP प्रमाणे निश्चित करून वेतन मिळणेसाठी संस्था कार्यालयास प्रस्ताव सादर केला होता परंतु याबाबत अद्यापही मंजुरी मिळालेली नाही.

या विषयाबाबत सभेने चर्चा करून योग्य मार्गदर्शन मिळावे.

**३. डॉ. सौ. उल्मेक अर्चना नितीन यांनी Three Ph.D. Increment मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत.**

महाविद्यालयातील इलेक्ट्रोनिकस ॲन्ड टेली. इंजिनिअरिंग या विभागातील डॉ. सौ.उल्मेक अर्चना नितीन सहाय्यक प्राध्यापक यांनी एप्रिल २०२४ मध्ये Ph.D. पदवी पूर्ण केली असून Three Ph.D. Increment मिळणेसाठी अर्ज सादर केला आहे. सदर अर्जाबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

**४. डॉ. सौ. बल्लाळ सुनिता राजेश यांनी Ph.D. Increment मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत.**

महाविद्यालयातील जनरल विभागातील विभागप्रमुख डॉ. सौ. बल्लाळ सुनिता राजेश सहाय्यक प्राध्यापक यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये Ph.D. पदवी पूर्ण केली असून Ph.D. Increment मिळणेसाठी अर्ज सादर केला आहे. सदर अर्जाबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

**वरील नुसार मा. प्राचार्यांनी सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून खालील प्रमाणे सूचित केले आहे.**

**मुद्दा.क्र. १.- महाविद्यालयातील सर्व ADHOC शिक्षक सेवकांचे एकाच वेळीस पगार वाढविण्याचा प्रस्ताव सादर करावा व एकाच वेळी ADHOC शिक्षकांचे पगार वाढविण्यात यावे. वैयक्तिक ADHOC सेवकांच्या पगाराबाबतचा विषय यापुढे कोणत्याही सभेमध्ये ठेवू नये असे सभेने सूचित केले.**

**मुद्दा क्र. २ - याबाबत मा. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या समवेत चर्चा करून याबाबतचा संस्था कार्यालयास पाठपुरावा करावा असे सूचित करणेत आले.**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत*

**मुद्दा क्र.३ व ४- महाविद्यालयास सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय झाल्याने सातव्या वेतन आयोगामध्ये पीएच.डी. Increment बाबत तरतूद नाही.**

**सूचक :- मा. चंद्रकांत दळवी साहेब**
**अनुमोदक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.११. - सेवानिवृत्त झालेल्या सेवकांनी विविध आर्थिक मागणीसाठी केलेल्या अर्जाबाबत योग्य निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ११** - महाविद्यालयातील सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी त्यांच्या विविध आर्थिक मागण्या साठी संस्था कार्यालयास व महाविद्यालयास अर्ज सादर करीत असतात याबाबत सभेने चर्चा करून योग्य मार्गदर्शन करावे. सोबत सेवकांचे अर्ज जोडलेले आहेत.

**याबाबत सभेने चर्चा करून सेवानिवृत्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना कोणताही आर्थिक फरकाचा लाभ विविध आर्थिक बाबी देण्यात येऊ नयेत असे सभेने सूचित केले.**

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १२ - वाय. सी. कॉलेज सातारा या महाविद्यालयातील विद्यार्थी या महाविद्यालयाचे वसतीगृह सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षात वापरत असलेल्या वसतीगृहाबाबत.**

**ठराव क्र. १२** – यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा या महाविद्यालयातील विद्यार्थी या महाविद्यालयाच्या मुलांच्या वसतीगृहात सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षात वापरत आहेत. वाय. सी. कॉलेज हे प्रत्येक विद्यार्थ्याकडून २५,५००/- रु फी घेत आहेत. सदर विद्यार्थी या महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहत असून देखील संबधित महाविद्यालयाने आज पर्यंत फी अदा केलेली नाही. तसेच सध्या वसतीगृहातील स्वच्छतागृह व विद्यार्थ्यांच्या खोल्या अतिशय खराब झाल्याने दुरूस्ती करणे गरजेचे आहे. त्यासाठी सदर महाविद्यालयाकडून विद्यार्थांच्या फी घेणे बाबत चर्चा करणे व मार्गदर्शन करावे.

**याबाबत सभेने चर्चा करून मा. सचिव साहेब यांच्या समवेत चर्चा करावी व प्रत्येक विद्यार्थ्याकडून किती फी येते याचा तपशील तयार करावा व महाविद्यालयाचे वसतिगृह यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा यांना भाडे (Rent) तत्वावर कसे देता येईल याबाबत चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा. त्याबाबत यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा या महाविद्यालयास पत्रव्यवहार करून कळवावे. असे सभेने सूचित केले.**

**सूचक :- डॉ सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. १३ :- डॉ. आलदर दिलीप एस. यांच्या महाविद्यालयातील वर्तुनीकीबाबत.**

**ठराव क्र १३:-** डॉ. आलदर यांना महाविद्यालयाने वेळोवेळी देण्यात आलेल्या कामकाजाची जबाबदारी टाळत आहेत व त्यांना देण्यात येणाऱ्या पत्रास उद्धट पणे उत्तर देत असतात यावर सभेने मार्गदर्शन करावे.

**महाविद्यालयातील डॉ. आलदर यांच्या वर्तुनीकीबाबतची माहिती सभेस दिली. यावर मा. चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी याबाबत संस्था स्तरावर योग्य ती कारवाही सुरु आहे असे सांगितले. तसेच याबाबतचे विषय संस्था स्थरावर ठेवण्यात यावे व त्याबाबतची प्रशासकीय कारवाही नियमानुसार करण्यात यावी असे सभेने सूचित केले.**

**सूचक :- मा. चंद्रकांत दळवी साहेब**
**अनुमोदक :- मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १४ :- महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.**

**विषय क्र. १४.१ - महाविद्यालयातील कार्यरत असलेले १७ शिक्षकेत्तर सेवकांना २४ वर्षाची कालबद्ध पदोन्नतीचा माहे जानेवारी २०२४ पासून फरक देण्याबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १४.१** – महाविद्यालयातील खालील तक्त्यातील शिक्षकेत्तर सेवकांना सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार सेवाकालास २४ वर्ष पूर्ण झाल्याने सदर सेवकांचे वेतननिश्चितीचे प्रस्ताव संस्था कार्यालयास मंजुरी साठी पाठविण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रस्ताव तपासून मा. सहसचिव (उ. शि) रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या कडील पत्र जा. क्र. उ.शि. १२४३७, दि. २५.११.२०२४ रोजीच्या पत्रानुसार उच्च शिक्षण समितीच्या बैठकीमधील ठराव क्र. ८ ने मान्यता देण्यात आलेली आहे असे कळविणेत आले आहे. त्यानुसार खालील तक्त्यातील शिक्षकेत्तर सेवकांना सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार दुसरा लाभास पात्र असल्याने माहे नोव्हेंबर २०२४ पासून दुसरा लाभाची वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्यानुसार खालील तक्त्यातील सेवकांना माहे जानेवारी २०२४ पासून दुसरा लाभाची वेतनश्रेणी लागू करण्यास परवानगी दिली.

| अ.क्र | सेवकाचे नाव | पद | २४ वर्ष पूर्ण झालेली तारीख |
|---|---|---|---|
| १ | श्री. भोसले संजीवन शिवाजी | टेक्निकल लॅब असी. | २८.०२.२०१७ |
| २ | श्री. निंबाळकर विजयकुमार शंकरराव | टेक्निकल लॅब असी. | १६.०२.२०१२ |
| ३ | श्री. नळे प्रभाकर मधुकर | टेक्निकल लॅब असी. | २८.०२.२०१७ |
| ४ | श्री. दराडे सतिश काळूसिंग | टेक्निकल लॅब असी. | १४.०१.२०२१ |
| ५ | श्री. जगदाळे सुहास जयसिंगराव | टेक्निकल लॅब असी. | १४.०१.२०२१ |
| ६ | श्री. नलवडे शशिकांत विठोबा | ग्रंथालय लिपिक | ०५.०२.२०२० |
| ७ | श्री. इंदलकर पाटील हनमंत जे. | ग्रंथालय लिपिक | १४.११.२०१९ |
| ८ | सौ. सय्यद अंजुमआरा रज्जाक | टेलीफोन ऑपरेटर | २७.१०.२०२० |
| ९ | श्री. भुरके संदीप बबनराव | शिपाई | १२.०३.२०२० |
| १० | श्री. दौंडे विजय गणपत | शिपाई | ३०.०९.२०२० |
| ११ | श्री. गाडे जयवंत मुगुटराव | शिपाई | ३०.०४.२०१६ |
| १२ | श्री. रणखांबे जालिंदर गणपती | शिपाई | ०५.०१.२०११ |
| १३ | श्री. देवरुखे धनंजय शंकर | शिपाई | १०.११.२००७ |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | श्री. गुडीले संजीव अप्पाराव | शिपाई | ०९.१०.२००८ |
| १५ | श्री. गायकवाड दिनकर सिदू | सफाई कामगार | ०१.०९.२००८ |
| १६ | श्री. भोसले पोपट भगवान | वाचमन | ३१.०७.२०२२ |
| १७ | श्री. काकडे संजय बाजीराव | शिपाई | ३०.०६.२०२० |

**सभेने चर्चा करून वरील तक्त्यातील एकूण १७ सेवकांना सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार सेवाकालास २४ वर्ष पूर्ण झाल्याने ०१ जानेवारी २०२४ पासून सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभाची वेतनश्रेणी लागू करण्यास व फरक देण्यास सभेने परवानगी दिली.**

**विषय क्र. १४.२ - Artificial Intelligence & Data Science या नवीन विद्याशाखेस आवश्यक असणाऱ्या साहित्यांची खरेदी करणेस परवानगी घेणेबाबत.**

**ठराव क्र. १४.२** - शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महाविद्यालयात Artificial Intelligence & Data Science हि नवीन विद्याशाखा सुरु करणेत आलेली आहे. सदर विद्याशाखेस लॅब व वर्गखोल्या आवश्यक असल्याने त्यामध्ये बेंचेस, संगणक व फर्निचर खरेदी करण्यास अंदाजे येणाऱ्या खर्चास सभेची परवानगी मिळावी.

| अ.क्र | तपशील | खरेदी करणेत येणारे साहित्य | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १. | बेंचेस | १८० | १४,४०,०००/- |
| २. | संगणक | १०० | ५०,००,०००/- |
| ३ | फर्निचर | -- | १५,००,०००/- |

**वरील तक्त्यानुसार संगणक खरेदी बाबत मा. प्रतापराव पवार साहेब यांनी कंपनीच्या सी.एस.आर फंडातून किंवा इतरांमार्फत संगणक महाविद्यालयास उपलब्ध करून घ्यावेत असे सूचित केले व त्यानुसार मा. प्रतापराव पवार साहेब यांनी मा. डॉ. संतोष भोसले यांच्याशी संपर्क करून CSR फंडातून ५० संगणक मिळण्याचा प्रयत्न करावा. तसेच Artificial Intelligence & Data Science या नवीन विद्याशाखेस लागणारे बेंचेस व फर्निचर यासाठी येणारा खर्च याचा सविस्तर अहवाल तयार करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा असे सभेने सूचित केले.**

**विषय क्र. १४.३ - महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे.**

**ठराव क्र. १४.३** – महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी सिव्हील वर्क, फर्निचर, Aqustick , इलेक्ट्रिकल कामकाज इ. बाबतचा सविस्तर अहवाल तयार करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा असे सभेने सूचित केले.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. १४.४ - महाविद्यालयातील सुरक्षा एजन्सी यांचे मानधन अदा करणेस परवानगी घेणेबाबत.**

**ठराव क्र. १४.४-** सन २०२३-२४ मध्ये महाविद्यालयासाठी सुरक्षा एजन्सी यांची ऑनलाईन निवेदाद्वारे रीतसर नेमणूक करणेत आलेली होती. सदर नेमणूक नुसार रीतसर संस्थेमार्फत सुरक्षा एजन्सीला आदेश देण्यात आलेला होता. सदर नेमणुकीचा कालावधी हा माहे सप्टेंबर २०२४ ला पूर्ण झालेला आहे. त्यानुसार पुढील सुरक्षा एजन्सी याची नेमणूक करणेसाठी माहे ऑक्टोबर २०२४ मध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणूका असल्याने ऑनलाईन निवेदा देण्याचे थांबविण्यात आले होते. सदर सुरक्षा एजन्सीची निवेदा वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असून ऑनलाईन निवेदाची प्रक्रिया सुरु आहे. तरी पुढील सुरक्षा एजन्सीची निविदा मंजूर होईपर्यत सध्या सुरु असलेल्या सुरक्षा एजन्सी यांची सेवा सुरु ठेवण्यास व मानधन देण्यास सभेची परवानगी मिळावी.

**सभेने चर्चा करून महाविद्यालयातील सुरक्षा एजन्सीची पुढील निविदा मंजूर होईपर्यत सध्या सुरु असलेल्या सुरक्षा एजन्सीची सेवा सुरु ठेवण्यास व दरमहा मानधन देण्यास सभेने परवानगी दिली.**

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा